Shivaji College Hingoli Dist. Hingoli

2020-21

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist Hingoli

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salman Bin Abdul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerce, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College, Hingoli, Dist. Hingoli

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या सामाजिक विचाराचा संवादात्मक अभ्यास<br>**विद्या मधुकरराव इंगोले** | १३२-१३४ |
| २५ | गांधी विचाराची सद्यस्थितीतील प्रस्तुतता - एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. ढाले एस. यु.** | १३५-१३९ |
| २६ | धनगर जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. एन. आर. हुरगूळे** | १४०-१४५ |
| २७ | हैद्राबाद स्वातंत्र संग्रामात काँ. विठ्ठलराव नाईक यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर** | १४६-१५० |


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २५. गांधी विचाराची सद्यस्थितीतील प्रस्तुतता - एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. ढाले एस. यु.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

## प्रस्तावना

भारतीय राजकीय विचारामध्ये गांधी विचाराचे महत्वपूर्ण स्थान आहे. महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करीत असताना मानवी जीवनाविषयी मांडलेले विचार, दिलेली कार्यपध्दती यामुळे ते २१ व्या शतकातील सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्व ठरतात. त्यांनी सत्य, अहिंसा व सत्याग्रह या महत्वपूर्ण संकल्पनाची देणगी संपूर्ण मानव जातीस दिली आहे. या संकल्पना प्राचीन भारतीय तत्वज्ञानात असल्या तरी या संकल्पनाचे उपयोजन राजकीय क्षेत्रात करून राजकारणाला अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. त्यांनी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, व राजकीय क्षेत्राविषयी मांडलेले विचार महत्वपूर्ण आहेत. त्यांच्या या विचारांचा प्रभाव त्यांच्या नंतरच्या काळातही जागतिक राजकारणावर व भारतीय राजकारणावर कायम टिकून आहे. त्यांच्या विचाराची व त्यांच्यानंतर त्यांच्या अनुयायांनी स्विकारलेल्या गांधी विचाराची सद्यस्थितीमध्ये असणारी प्रस्तुतता याविषयीचा थोडक्यात आढावा प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

## उद्देश

महात्मा गांधी आणि उत्तर गांधी विचारांची सद्यस्थितीतील प्रस्तुतता या शोधनिबंध लेखनाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

१. महात्मा गांधी विचार व उत्तर गांधी विचार जाणून घेणे.

२. गांधी विचाराची व उत्तरगांधी विचाराची प्रस्तुता जाणून घेणे.

## महात्मा गांधीचे विचार

महात्मा गांधी हे एक राजकीय विचारवंत किंवा तत्वज्ञ नव्हते. तर त्यांनी मानवी जीवनाविषयी केलेले चिंतन व विचारालाच गांधीवाद म्हणतात. महात्मा गांधी यांना भारतीय संस्कृती व परंपराचा अभिमान होता. प्राचीन राज्यात आर्थिक सुबत्ता होती. खेडी स्वयंपूर्ण होती. सर्व नागरिक सुरक्षित होते. त्याप्रमाणे वर्तमान युगातही राज्य निर्माण करता येणे शक्य आहे असे त्यांचे मत होते. यासाठी राज्याती सर्वात शेवटच्या घटकाचा विकास करण्याची आवयकता आहे. यासाठी त्यांनी सर्वोदय हा शब्द जगापुढे ठेवला. सर्वोदय या संकल्पनेचा वापर करणारे महात्मा गांधी हे पहिले विचारवंत आहेत. सर्वोदय या संकल्पनेचा अर्थ सर्वांचा उदय किवा सर्वांचे कल्याण असा होतो. महात्मा गांधीच्या मते, सर्वोदयमध्ये मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय बाजूचा विचार केला जातो. सर्वांचे कल्याण साधणे हे सर्वोदयाचे उद्दिष्ट असल्याने या चळवळीव्दारे प्रत्येकाला काम, पुरेसे अन्न, वस्त्र व निवारा मिळण्याची खात्री होईल. सर्वात खालच्या म्हणजे



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

वंचित, दुर्लक्षित घटकाचा विकास होय. यासाठी समाजात सर्व प्रकारचे श्रम महत्वाचे असून त्याला समान महत्व देणे गरजेचे आहे.

**विश्वस्त कल्पना**

महात्मा गांधी यांनी एक नाविण्यपूर्ण महत्वाचा आर्थिक विचार जगाला दिला आहे. तो म्हणजे विश्वस्त कल्पना. या विश्वस्त कल्पनेच्या माध्यमातून त्यांनी श्रम आणि भांडवल यांचा संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. संपत्ती ही ईश्वरी देण असल्याने त्या संपत्तीवर सर्वांची मालकी प्रस्थापित झाली पाहिजे. समाजातील अतिरिक्त संपत्ती धारकांनी आपल्याकडील अतिरिक्त संपत्ती समाजासाठी उपयोगात आणून तिचा विश्वस्त म्हणून काम करावे.[१] त्यामुळे गरीबांच्या मनात श्रीमंताबद्दल व्देष निर्माण होणार नाही. गरीब—श्रीमंत यामधील अंतर कमी होवून समाजात आर्थिक समानता निर्माण होईल.

आर्थिक व राजकीय क्षेत्रात सर्वांचा उदय घडवून आणण्यासाठी आणि रामराज्याच्या स्थापनेसाठी विकेंद्रीकरण हेच एकमेव साधन आहे असे त्यांचे मत होते. याचबरोबर खादीचा वापर, न्यायव्यवस्था नई तालिम (शिक्षणव्यवस्था) याविषयी विचार व्यक्त करून मानवी जीवन सुखमय करण्याचा विचार त्यांनी केला आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्यलढयासाठी त्यांनी सत्याग्रहाच्या विविध तंत्राचा अवलंब केला आहे. यासाठी त्यांनी सत्य, अहिंसा या मूल्यांना महत्व दिले.[२]

**उत्तर गांधी विचार**

महात्मा गांधी यांच्यानंतर त्यांच्या अनुयायांनी गांधी विचाराचा प्रसार व प्रचार केला. आचार्य विनोबा भावे यांनी महात्मा गांधीच्या स्वप्नातील स्वराज्य साकार करण्यासाठी भुदान ते ग्रामदान चळवळ सुरू केली. भुदान यज्ञाचा उद्देश जमीनीच्या ग्रामीकरणाच्या पायावर ग्रामोदयोगप्रधान अहिंसक समाज निर्माण करणे हा आहे.३ याचबरोबर त्यांनी ज्याच्याजवळ जमीन नाही त्यांनी श्रमदान, प्रेमदन, बुध्दीदान, जीवनदान, ग्रामदानाविषयी लोकांना आवाहन केले. त्यांच्या आवाहनानूसार लोकाचा त्यांना मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला. त्यांच्याबरोबर व त्यांच्यानंतर जयप्रकाश नारायण यांनी गांधी विचारांना पुढे नेण्याचे काम केले.[३] सर्वोदय विचारातील व कार्यातील त्रुटी जयप्रकाश नारायण यांना लक्षात आल्या. त्या त्रुटी दूर करण्यासाठी त्यांनी तत्वज्ञानाचा व उपक्रमाचा समन्वय गांधीप्रणीत सत्याग्रह कल्पनेशी घालण्याची नितांत आवश्यकता असल्याचे जयप्रकाश नारायण यांचे मत होते. यामधूनच त्यांच्या समग्र क्रांतीचा विचार पुढे आला.

१९७३ मध्ये त्यांनी 'यूथ फॉर डेमॉक्रेसी' या अपक्षीय शांततापूर्ण, क्रीयाशील आणि शिक्षण व निवडणुकप्रणालीमध्ये सुधारणेचा विचार मांडला. अहिंसेचे तत्व आंतरराष्ट्रीय संबंधांना लागू करण्याचा प्रयत्न जयप्रकाश नारायण यांनी केला.

जयप्रकाश नारायण यांच्यानंतर अण्णा हजारे, बाबा आमटे, प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग, बाबा आढाव, मेधा पाटकर यांच्यासारख्या असंख्य गांधीवादी विचारवंतानी, अभ्यासकांनी व कार्यकर्त्यांनी गांधीवादी विचारसरणीने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, आरोग्य व पर्यावरणीय लढे दिल आहेत.[४] सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये या सर्वांचे योगदान महत्वाचे ठरले आहे.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

**सद्यस्थितीतील गांधी व उत्तरगांधी विचारांची प्रस्तुतता**

महात्मा गांधी यांनी मानवी जीवनाविषयी केलेले चिंतन आणि त्यामधून व्यक्त झालेल्या मतांना गांधीवाद असे म्हणतात. या गांधीवादी विचार त्यांच्यानंतरही पुढे त्यांच्या अनुयायांकडून, शासनकर्त्यांकडून अंशतः स्विकारला आहे. गांधीवाद हा केवळ विचार नसून जीवन जगण्याचा मार्ग आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनाची ती गुरूकिल्ली आहे.

महात्मा गांधी यांनी राज्याला व्यक्तिच्या कल्याणचे साधन मानले आहे. त्यांनी राज्याच्या विकासाचा विचार करीत असताना समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या विकासाला महत्व दिले आहे. विकासापासून वंचित, दुर्लक्षित घटकांच्या विकासाला राज्यांनी प्राधान्य देणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात शासनाचे ग्रामीण भागातील शेवटच्या व्यक्तीकडे फारसे लक्ष नाही. एकाच राष्ट्रामध्ये इंडिया आणि भारत निर्माण झाला आहे. इंडिया हा श्रीमंत भांडवलदाराचे प्रतिनिधीत्व करतो. परंतु ग्रामीण भागातील नागरिक आजही मुलभूत गरजांसाठी संघर्ष करतांना दिसतो. शेती दुष्काळाच्या दुष्ट चक्रात अडकली आहे. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव नाही. अन्नधान्याच्या किमतीवर नियंत्रण आहे. भाजीपाल्याचे दर काढू दिले जात नाहीत. शेतीसाठीची जमीन उदयोगपतींना उदयोगासाठीदिली जात आहे.[५] यासाठी विविध कयदे तयार करून त्याची अंमलबजावणी करणारे महात्मा गांधी यांचे नाव घेवून राजकारण करणारे आहेत.

महात्मा गांधी यांनी विकेंद्रीकरणावर भर दिला आहे. परंतु सध्या सर्वच उदयोगाच केंद्रीकरण शहरी भागात झाले आहे. राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होत आहे. पंचायतराजच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण झाले असले तरी या संस्थांना फारशी स्वायत्तता नाही. त्यांना केंद्र व राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली कार्य करावे लागते.[६] त्यामुळे विकेंद्रीकरणाचा विचार प्रत्यक्षात येण्याची गरज आहे.

आदर्श राज्यासाठी समता हा घटक महत्वाचा आहे. शिक्षणाने समता प्रस्थापित होईल ही अपेक्षा होती परंतु प्रत्यक्षात सर्वासाठी समान शिक्षण नसल्याने विषमताच वाढत आहे. शासनातील अधिकारी, मंत्री, राज्यपाल, न्यायमूर्ती, वकील, प्राध्यापक, शिक्षक यांची मुले मातृभाषेत शिक्षण न घेता पाश्चात्य भाषेतून शिक्षण घेतांना दिसतात. या शाळेमध्ये सामान्याची मुले नसतात. हे महात्मा गांधी यांच्या तत्वाच्या विरूध्द आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी बीबीसी च्या वार्ताहराला गांधीजींनी सांगितले होते की, संपूर्ण जगाला हे सांगा की, आजपासून गांधीला इंग्रजी येत नाही. यात कुठल्याही भाषेबद्दलचा विरोध अगर व्देष नव्हता. तर ती स्वराज्य व स्वदेशीची भावना होती. आज इंग्रज गेले तरी 'अंग्रेजियत' कायम आहे.[७]

भारतामधील सर्वच राजकीय पक्ष किंवा नेता असा नाही की, ज्याच्या मागे–पुढे प्रदेश, जातीधर्म, संप्रदाय याचे लेबल चिकटवले जावू शकणार नाही. ही सर्व लेबल प्रादेशिकता, अखिल भारतीयत्वाची गळचेपी करत आहेत. याची साधी जाणीवही होत नाही. प्रादेशिकता व प्रदेशाचे राजकारण अखिल भारतीय राष्ट्रीय भावनेपेक्ष वरचढ ठरत आहे. राष्ट्रनिष्ठेपेक्षा पक्षनिष्टा श्रेष्ठ मानली जाते. देशप्रेम व राष्ट्रप्रेम याचं स्थान प्रादेशिक अस्मिता घेत आहेत हीच खरी गांधीनंतरच्या राजकारणाची शोकांतिका आहे.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

गांधीजींचे राष्ट्रकारण हे सत्य व अहिंसा या मुल्यांवर आधारीत आहे. त्यात संघर्ष व विधायकता या दोन्ही मुल्यांचा समावेश होता. गांधीजींचा सत्याग्रही हा सत्याग्रही आहे. तो जीवनाच्या सर्वक्षेत्रात सत्याची उपासना हे व्रत व ध्येय पाळत असे. जो सत्याग्रही नसेल त्याला सत्याग्रह करण्याचा अधिकार नसतो. जो स्वत: असत्य वर्तन करत असेल व इतरांवर अन्याय करत असेल त्याला सत्याग्रह करण्याचा अधिकार नसतो हे राष्ट्रकारणाचे मुलतत्त्व मानावे लागेल. सत्याग्रहाच्या या लढ्याचे दोन प्रकार आहेत.[८] एक अन्यायविरूध्दची लढाई तर दूसरा लढा स्वत:च्या दुबर्लतेविरूध्द. परंतु आजचे सत्याग्रह हे दुराग्रहच आहेत. त्यांनी स्विकारलेल्या सत्य व अहिंसा या मार्गाचा आज सर्वात अधिक असत्य व हिंसक मार्गाने राजकारणात होत आहे. उपोषणाचा उपयोग धमकीवजा किंवा बंदूक रोखल्याप्रमाणे होत आहे. त्यात आत्मक्लेश किंवा आत्मबल नावासाठीही नाही. आजचा सत्याग्रह व उपवास यात वीरवृत्ती ऐवजी वैरवृत्तीच अधिक असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीच्या विचारामध्ये सत्य, अहिंसा या मूल्यांना महत्वाचे स्थान आहे.

२. गांधी विचारामध्ये सर्वोदय, विश्वस्त कल्पना, विकेंद्रीकरण, समता या मूल्यांना महत्व आहे.

३. सत्याग्रहाचा मार्ग गांधी विचाराची देणगी आहे.

४. गांधी तत्वज्ञानाला त्यांच्या अनुयायांनीच हरताळ फासला आहे.

५. गांधीवादीतील स्वराज्य व स्वदेशीची जागा स्वतंत्रता या शब्दाने घेतली आहे.

६. भारतीय राजकारणाच्या स्वदेशीकरणाची आवश्यकता आहे.

७. असत्य व हिंसक मार्गाचा राजकारणत सर्रास वापर होत आहे.

८. सत्याग्रहाच्या मार्गाचा अयोग्य वापर.

**सारांश**

महात्मा गांधी यांच विचाराचा प्रभाव आजही काही प्रमाणात राजकारणावर दिसून येत असला तरी गांधी नावाचा उपयोग केवळ राजकारणासाठी केला जात आहे. आज जगामध्ये शांतता व विकास प्रस्थापित करावयाचा असेल तर गांधी विचाराशिवाय पर्याय नाही. महात्मा गांधी यांचे विचार वर्तमानकालीन समस्यांवरील उपाय आहेत. मानवी जीवनातील सर्व प्रश्नांची सोडवणूक गांधी विचाराने शक्य आहे. राष्ट्र विकासासाठी, संस्कृती संवर्धनासाठी, मानवी मूल्याच्या रक्षणासाठी आणि नैतिक, परिपूर्ण मानवी विकासासाठी गांधी विचार वर्तमान युगातही आवश्यक आहेत. त्यांच्या विचारांना त्यांच्या अनुयायांनी संपवले असले तरी गांधीविचार संपलेले नाहीत. तर त्याचे महत्व आज प्रकर्षाने जाणवत असल्याने सदयस्थितीत गांधी विचाराची प्रस्तुतता आहे.

**संदर्भसूची**

१. भोळे, भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ४८८

२. भोळे, भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ४८९

३. भोळे, भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ४९०



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

४. डॉ. आघाव, विलास., ढाले सुखनंदन, व इतर (२०१४), भारतीय राजकीय विचारवंत, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन.

५. न्या. धर्माधिकारी, चंद्रशेखर, (२०१४), महात्मा गांधीनंतरचे राजकारण, सकाळ, पुणे, सकाळ माध्यम समुहाचे प्रकाशन, २८.

६. न्या. धर्माधिकारी, चंद्रशेखर, (२०१४), महात्मा गांधीनंतरचे राजकारण, सकाळ, पुणे, सकाळ माध्यम समुहाचे प्रकाशन, २९.

७. भोळे, भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ४९०

८. भोळे, भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ४९१

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli